दिनेश
बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
खडी, क्रेशन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक (सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २४० । शनिवार २० जून २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

### दिंडी निधी घोटाळा आणि बी-१ निविदा प्रकरण गाजले;

## संभाजी ब्रिगेडच्या 'आली मरीआई' आंदोलनापुढे प्रशासन नमले, उच्चस्तरीय चौकशीचे आदेश



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जनतेच्या हक्काच्या पैशावर डल्ला मारणाऱ्या भ्रष्ट प्रवृत्तींच्या विरोधात संभाजी ब्रिगेडने आज जिल्हा परिषद अहिल्यानगर येथे पारंपरिक 'आली मरीआई' आंदोलन करत प्रशासनाला धारेवर धरले. जून २०२५ मध्ये पायी दिंडी वारीसाठी वितरित करण्यात आलेल्या निधीतील कथित आर्थिक घोटाळा आणि जिल्हा परिषद अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या बी-१ निविदा प्रक्रियेतील संभाव्य गैरव्यवहारांच्या निषेधार्थ हे आंदोलन करण्यात आले. संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष राजेशदादा परकाळे यांच्या नेतृत्वाखाली पोतराज, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जिल्हा परिषद कार्यालयापासून मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनापर्यंत जोरदार मोर्चा काढला. वाद्यांचा गजर, पोतराजांचा पारंपरिक सहभाग आणि ''जय जिजाऊ, जय शिवराय'', ''भ्रष्टाचार मुर्दाबाद'', ''घोटाळेबाजांना शिक्षा झालीच पाहिजे'' अशा घोषणांनी संपूर्ण जिल्हा परिषद परिसर दणाणून गेला.

यावेळी संभाजी ब्रिगेडचे श्रीगोंदा तालुकाध्यक्ष शामभाऊ जरे यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी मा. भंडारे साहेब यांच्यासमोर संघटनेच्या मागण्या अत्यंत ठामपणे मांडल्या. दिंडी निधीच्या नावाखाली जनतेच्या पैशाची झालेली कथित उधळपट्टी, निविदा प्रक्रियेतील संशयास्पद बाबी आणि प्रशासनाच्या निष्क्रिय भूमिकेवर त्यांनी कठोर शब्दांत टीका केली. जनतेच्या पैशावर डल्ला मारणाऱ्या दोषींना तात्काळ निलंबित करून फौजदारी स्वरूपाची कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.

आंदोलनाची वाढती तीव्रता लक्षात घेऊन मुख्य कार्यकारी अधिकारी मा. भंडारे साहेब यांनी तातडीने शिष्टमंडळाला चर्चेसाठी बोलावले. सुमारे तासभर चाललेल्या चर्चेनंतर प्रशासनाने दिंडी निधी प्रकरणाच्या चौकशीसाठी उच्चस्तरीय चौकशी समिती नियुक्त करण्यात आल्याचे जाहीर केले. तसेच चौकशीत दोषी आढळणाऱ्या कोणत्याही अधिकारी, कर्मचारी अथवा संबंधित व्यक्तीची गय केली जाणार नसून कठोर प्रशासकीय व कायदेशीर कारवाई केली जाईल, असे स्पष्ट आश्वासन दिले.

याशिवाय बी-१ निविदा प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने राबविण्यात येईल, तसेच कोणताही गैरप्रकार अथवा आर्थिक घोटाळा झाल्याचे निष्पन्न झाल्यास संबंधित निविदा प्रक्रिया रद्द करण्यात येईल, असेही प्रशासनाने लेखी स्वरूपात नमूद केले. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडून लेखी आश्वासन मिळाल्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले. मात्र, दिलेल्या आश्वासनांची अंमलबजावणी झाली नाही, दोषींवर कारवाई झाली नाही किंवा चौकशी दडपण्याचा प्रयत्न ■ पान ४ वर


**लढा सुरूच राहील**

''जनतेच्या हक्काच्या पैशाची लूट खपवून घेतली जाणार नाही. चौकशी पूर्ण होऊन दोषींवर कठोर कारवाई होईपर्यंत संभाजी ब्रिगेडचा लढा सुरूच राहील.''

**राजेशदादा परकाळे,**
जिल्हाध्यक्ष, संभाजी ब्रिगेड

## सोनगाव सात्रळ शिवारात रेशनिंगचा काळाबाजार उघड

### १२ लाखांच्या मुद्देमालासह आरोपी जेरबंद । एलसीबीची कारवाई



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्थानिक गुन्हे शाखेने राहुरी तालुक्यातील सोनगाव सात्रळ शिवारात धडक कारवाई करत, रेशनिंगचा गहू आणि तांदळाच्या काळ्याबाजाराचा पर्दाफाश केला आहे. या कारवाईत एकूण १२ लाख २ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून एका आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे.

दिनांक १९ जून रोजी रात्री स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांना विश्वसनीय माहिती मिळाली की, सोनगाव सात्रळ येथील साई बालाजी फर्निचर शेजारी असलेल्या एका पत्र्याच्या गोदामात रेशनिंगचा गहू व तांदूळ बेकायदेशीर विक्रीसाठी साठवून ठेवण्यात आला आहे. त्यानुसार मुटकुळे यांनी पोलीस उपनिरीक्षक अनंत सालगुडे, पोलीस अंमलदार सुनील पवार, रिचर्ड गायकवाड आणि रमीजराजा अतार यांचे पथक तयार करून तात्काळ कारवाईसाठी रवाना केले.

पथकाने गोदामावर छापा टाकला असता, तिथे एक संशयित इसम आढळून आला. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता, त्याने आपले नाव यासिर सादिक तांबोळी (वय २६, रा. सोनगाव सात्रळ, ता. राहुरी) ■ पान ४ वर

## सुपा हद्दीतील दोन हॉटेल्सवर छाप्यात पाच महिलांची सुटका

### एलसीबीच्या कारवाईत कुंटणखान्याचा पर्दाफाश । चारजणांना अटक

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सुपा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील हॉटेलमध्ये चालणाऱ्या कुंटणखान्यावर स्थानिक गुन्हे शाखा व सुपा पोलिसांनी संयुक्तपणे कारवाई करीत पाच पीडित महिलांची सुटका केली. या प्रकरणी एकूण चार आरोपींना अटक करण्यात आली आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या पथकाला पळवे शिवार (ता. पारनेर) येथील हॉटेल्समध्ये कुंटणखाना चालवला जात असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे सुपा पोलीस ■ पान ४ वर



**या ठिकाणी टाकले छापे**

पहिल्या कारवाईत हॉटेल ओम साई येथून सुनील लक्ष्मण खोले (वय ३९, रा. नारायणगव्हाण) आणि विनोद विलास मिडाळेकर (वय २९, रा. बेळगाव) यांना ताब्यात घेण्यात आले. तेथून २ महिलांची सुटका करण्यात आली. चौकशीत हा व्यवसाय फरार आरोपी संग्राम कांडेकर (रा. नारायणगव्हाण) याच्यासाठी चालवला जात असल्याचे समोर आले. दुसऱ्या कारवाईत राखी पॅलेस लॉजिंगमधून दीपक सुनार आणि गोवर्धन ओमप्रकाश बुल (दोघे रा. नेपाळ) यांना अटक करण्यात आली. या ठिकाणी ३ महिलांची सुटका करण्यात आली. हा व्यवसाय फरार आरोपी वैभव साठे (रा. चास, अहिल्यानगर) याच्या सांगण्यावरून केला जात असल्याचे उघड झाले.

## सरसकट कर्जमाफीसाठी २३ जूनला पारनेर तहसीलवर जनआक्रोश मोर्चा

### खासदार नीलेश लंके यांच्या उपस्थितीत नियोजन बैठक । शेतकरी, सामाजिक संघटना व सर्वपक्षीय कार्यकर्त्यांचा सहभाग

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर –** शेतकऱ्यांच्या सरसकट कर्जमाफीसह विविध प्रलंबित प्रश्नांसाठी येत्या २३ जून रोजी पारनेर तहसील कार्यालयावर जनआक्रोश मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चाच्या नियोजनासाठी खासदार नीलेश लंके यांच्या उपस्थितीत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

बैठकीस तालुक्यातील शेतकरी, अखिल भारतीय काँग्रेस पक्ष, शिवसेना ( उबाठा ) , भूमिपुत्र शेतकरी संघटना, शिवबा संघटना, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, संभाजी ब्रिग्रेड, भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन या पक्ष तसेच सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत आंदोलन यशस्वी करण्याचा निर्धार व्यक्त केला.

यावेळी राज्यातील शेतकरी सध्या गंभीर आर्थिक संकटाचा सामना करीत असल्याची खंत व्यक्त करण्यात आली. अवकाळी पाऊस, दुष्काळी परिस्थिती, वाढता उत्पादन खर्च, शेतीमालाला मिळत नसलेला हमीभाव आणि वाढती कर्जबाजारीपणाची समस्या यामुळे शेतकरी अडचणीत सापडला असल्याचे उपस्थितांनी नमूद केले.



त्यामुळे शासनाने कोणत्याही अटी-शर्ती न लावता सरसकट कर्जमाफी जाहीर करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी एकमुखी मागणी बैठकीत करण्यात आली.

खासदार नीलेश लंके यांनी यावेळी मार्गदर्शन करताना शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत आपण कायम त्यांच्या पाठीशी उभे असल्याचे स्पष्ट केले. शेतकरी हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून त्याच्या न्याय्य हक्कांसाठी लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन उभारण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. शासनाने शेतकऱ्यांच्या मागण्यांचा गांभीर्याने विचार करून तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा जनआक्रोश अधिक तीव्र होईल, असा इशाराही त्यांनी दिला.

२३ जून रोजी होणारा जनआक्रोश मोर्चा ■ पान ४ वर

## मजबूत पक्ष बांधणी करून अहिल्यानगर शहरावर शिवसेनेचा भगवा पुन्हा फडकवू : किरण काळे

### वर्धापन दिनानिमित्त ठाकरे शिवसेनेच्या सदस्य नोंदणी अभियानाला सुरुवात, ५००० चे उद्दिष्ट



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पंचवीस वर्ष अहिल्यानगरकरांनी शिवसेनेला भरभरून प्रेम दिल. शिवसेनेन शहराला आपल्या मुलासारखं जपलं. आजचा दिवस संघर्षाचा आहे. परंतु संघर्षाच्या छाताडावर नाचतो तोच खरा शिवसैनिक. दिसतं तसं नसतं. विकासाचा खोटा दिखावा उभा करून काही लोक नगरकरांना भ्रमित करत आहेत. पण अंधारातून घडवल्या जाणाऱ्या गोष्टी शहराची वाताहात करणाऱ्या आहेत. आम्ही शिवसेनेची पुन्हा मजबूत बांधणी करू. शिवसैनिक शहराच्या कानाकोपऱ्यात जाऊन पाच हजार सदस्यांच्या नोंदणीसाठी काम करतील. मजबूत पक्ष बांधणी करून अहिल्यानगरकरांच्या पाठिंब्याने आम्ही शहरावर शिवसेनेचा भगवा पुन्हा फडकवू, असा विश्वास ठाकरे शिवसेनेचे महानगर प्रमुख किरण काळे यांनी व्यक्त केला आहे. पक्षाच्या साठाव्या वर्धापन दिनानिमित्त सदस्य नोंदणी अभियानाला जोषपूर्ण वातावरणात काळे यांच्या नेतृत्वाखाली बाजारपेठेतून सुरुवात करण्यात ■ पान ४ वर



## दै. आकर्षण निवडक

### अहिल्यानगरची ईश्वरी गागरे एमएसटी-सीईटीमध्ये मुलींमध्ये राज्यात अव्वल

अहिल्यानगर - शेतकरी कुटुंबातील



अहिल्यानगरची कन्या ईश्वरी सुरेश गागरे हिने - २०२६ परीक्षेत दैदिप्यमान यश मिळवले आहे. ईश्वरीने मुलींच्या गटात राज्यात अव्वल क्रमांक पटकावत संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष वेधून घेतले आहे. तसेच मुला-मुलींच्या एकत्रित गुणवत्तायादीत अहिल्यानगर जिल्ह्यात प्रथम येण्याचा बहुमानही तिने मिळवला आहे.वनकुटे (ता. पारनेर) येथील ईश्वरीने प्रतिकूल परिस्थितीतही शिक्षणाची कास धरत सातत्यपूर्ण परिश्रम, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या बळावर हे यश संपादन केले आहे. तिने १०० परसेंटाइल गुण मिळववून तिच्या या यशामुळे केवळ तिच्या कुटुंबाचाच नव्हे तर संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्याचा गौरव वाढला आहे.या परीक्षेत राज्यात अव्वल स्थान मिळवणे ही अत्यंत अभिमानास्पद बाब मानली जाते. ईश्वरीच्या या यशामागे तिची अभ्यासावरील निष्ठा, नियोजनबद्ध तयारी आणि कुटुंबीयांचे प्रोत्साहन असल्याचे तिने सांगितले आहे.ईश्वरी ही बीएसएनएल एम्प्लॉईज युनियनचे ज्येष्ठ नेते आप्पासाहेब गागरे व पारनेर मधील डॉ. अण्णासाहेब गागरे यांची पुतणी असून तिच्या यशामुळे गागरे कुटुंबात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. निकाल जाहीर होताच नातेवाईक, मित्रपरिवार, शिक्षक आणि ग्रामस्थांनी तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला. ईश्वरीच्या या उल्लेखनीय यशाबद्दल आमदार काशिनाथ दाते यांनी तिचे विशेष अभिनंदन केले.

### रयतच्या उत्तर विभागीय समन्वय समितीवर आबासाहेब कोकाटे सर यांची निवड

अहिल्यानगर - रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागीय समन्वय समिती सदस्यपदी चिचोंडी पाटील येथील ज्येष्ठ शिक्षक नेते आबासाहेब कोकाटे सर यांची निवड करण्यात आली आहे. रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलच्या बैठकीतील ठराव क्रमांक ८ अन्वये ही निवड जाहीर करण्यात आली असून, त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि संस्थात्मक कार्याची दखल घेत त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.आबासाहेब कोकाटे सर यांनी यापूर्वी उत्तर विभागीय सल्लागार समिती सदस्य म्हणून कार्य केले असून, अनेक वर्षे न्यू इंग्लिश स्कूल, चिचोंडी पाटील विद्यालयात स्कूल कमिटी सदस्य तसेच अध्यक्ष म्हणूनही यशस्वीपणे जबाबदारी सांभाळली आहे. त्यांच्या नेतृत्वामुळे विद्यालयाच्या भौतिक आणि गुणात्मक वाढीस मोठी चालना मिळाली आहे. विद्यालयाच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. स्कूल कमिटी सदस्य, सल्लागार समिती सदस्य, गावातील प्रतिष्ठित नागरिक, माजी विद्यार्थी आणि हितचिंतक यांच्या बहुमोल सहकार्याने नुकतीच सुमारे २ कोटी ९० लाख रुपये खर्चून २१ खोल्यांची सर्व सोयी-सुविधांनी युक्त भव्य इमारत उभारण्यात आली. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पात त्यांचे योगदान अत्यंत मोलाचे राहिले आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करून रोटरी क्लब अहिल्यानगर यांच्या माध्यमातून विद्यालयात आरओ प्लांट बसविण्यात आला असून, विद्यार्थ्यांना शुद्ध पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

### सौ.सुमन गायके यांचे निधन

अहिल्यानगर- सावेडी उपनगरातील



शिलाविहार येथील रहिवाशी सौ.सुमन रामदास गायके यांचे गुरुवार दि.१८ जून रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्या ८५ वर्षांच्या होत्या. नगर येथील अमरधाम मध्ये त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पती, २ मुले, सुना, २ मुली, जावई, नातवंडे,पतवंडे असा परिवार आहे. डॉ. राजेंद्र गायके व श्री.नंदकुमार गायके यांच्या त्या मातोश्री होत.

# गुरु अर्जुन देवजींचे बलिदान आजही समाजासाठी प्रेरणादायी – आ. संग्राम जगताप

**गुरु अर्जुन देवजींच्या शहिदी दिनानिमित्त तारकपूरमध्ये लंगर व सरबत वाटप | जीएनडी ग्रुपचा मानवतेचा संदेश**



**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शीख धर्माचे पाचवे गुरु तथा मानवतेचे उपासक गुरु अर्जुन देवजी यांच्या शहिदी दिनानिमित्त तारकपूर परिसरात गुरु नानक देवजी (जीएनडी) ग्रुपच्या वतीने अभिवादन करण्यात आले. यानिमित्त नागरिकांसाठी लंगर (प्रसाद) तसेच थंडगार सरबताचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाचा शुभारंभ आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते प्रसाद वाटप करून करण्यात आला.

शहिदी दिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमात गुरु अर्जुन देवजी यांच्या कार्याचा आणि बलिदानाचा गौरवपूर्ण स्मरण करण्यात आले. शीख धर्मातील सेवा, समता, बंधुता आणि मानवतेचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला. यावेळी जनक आहुजा, नगरसेविका हरप्रीतकौर गंभीर, जीतू गंभीर, अजिंक्य बोरकर, जय भोसले, गजेंद्र भांडवलकर, मनीष खुराणा, अमन खुराणा, संजय आहुजा, करन आहुजा, बल्लू सचदेव, बबलू खोसला, किशोर कंत्रोड, गौरव कंत्रोड, गुनीत कंत्रोड, सागर कुमार, मनोज मनोचा, रोहित बत्रा, मॉन्टी तलवार, गिरीश खन्ना, विनीत कंत्रोड, गोलू गंभीर, खुश कंडुजा यांच्यासह अनेक मान्यवर व नागरिक उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना आमदार संग्राम जगताप यांनी गुरु अर्जुन देवजी यांच्या जीवनकार्याचा गौरव केला. ते म्हणाले की, गुरु अर्जुन देवजी हे मानवतेचे खरे सेवक आणि धर्माचे निष्ठावान रक्षक होते. त्यांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात समाजसेवा, अध्यात्म आणि लोककल्याणासाठी कार्य केले. अन्याय, अत्याचार आणि दडपशाहीसमोर कधीही न झुकता त्यांनी आपल्या धर्मनिष्ठेचे पालन केले. अमानुष छळ सहन करूनही त्यांनी धर्माचा त्याग केला नाही. शीख धर्मासाठी ते शहीद होवून इतिहासात अजरामर झाले. त्यांच्या हौतात्म्यामुळे शीख धर्माच्या इतिहासाला नवे वळण मिळाले आणि अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा समाजाला मिळाली. आजही त्यांचे जीवन आणि बलिदान समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमात जनक आहुजा यांनीही गुरु अर्जुन देवजी यांच्या कार्यावर प्रकाश टाकला. ते म्हणाले की, गुरु अर्जुन देवजी यांनी अमृतसर येथील गुरु रामदास सरोवराचे काम पूर्णत्वास नेले. तसेच शीख धर्माचा पवित्र ग्रंथ असलेल्या गुरु ग्रंथ साहिब यांच्या संकलनाचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी पूर्ण केले. समाजात आध्यात्मिक जागृती आणि सामाजिक एकात्मतेचा संदेश देण्याचे कार्य त्यांनी सातत्याने केले. त्यांच्या विचारांचा प्रभाव वाढत असल्याने तत्कालीन मुघल सत्तेला तो खटकला. परिणामी त्यांना अमानुष छळाला सामोरे जावे लागले. मात्र धर्म आणि सत्याच्या मार्गावरून न ढळता त्यांनी शहिदी स्वीकारली. त्यांच्या त्यागामुळे धर्मनिष्ठा, सहनशीलता आणि मानवतेचा आदर्श समाजासमोर उभा राहिला, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या माध्यमातून गुरु अर्जुन देवजी यांच्या कार्याचे स्मरण करत त्यांच्या विचारांचा वारसा जपण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला.

# अर्थ आधार शक्ती फेडरल बचत गटाचा मेळावा २१ जूनला

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आर्थिक सक्षमीकरण, आर्थिक स्वावलंबन आणि बचतीची संस्कृती रुजविण्याच्या उद्देशाने अर्थ आधार शक्ती फेडरल बचत गटाच्या वतीने रविवार दि. २१ जून रोजी सायंकाळी ६.३० वाजता बचत गटाचा भव्य मेळावा आयोजित करण्यात आला आहे. यावेळी 'अर्थविश्व' या मार्गदर्शक पुस्तकाचे प्रकाशन करण्यात येणार असून बचत गट चळवळीला नवी दिशा देण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याची माहिती बचत गटाचे अध्यक्ष विजय गाडळकर, उपाध्यक्ष पारुनाथ ढोकळे (सर) आणि सचिव मेजर शिवाजी वेताळ यांनी ही माहिती दिली.

मेळाव्याच्या निमित्ताने बचत गटाच्या माध्यमातून दर तीन महिन्यांनी आर्थिक साक्षरता अभियान राबविण्याची घोषणा करण्यात आली आहे. या अभियानांतर्गत विविध क्षेत्रातील अर्थतज्ज्ञांना निमंत्रित करून सदस्यांना अर्थव्यवस्था, बचत, गुंतवणूक, उद्योग-व्यवसाय आणि आर्थिक नियोजन याविषयी मार्गदर्शन केले जाणार आहे.

'अर्थविश्व' ही पुस्तिका आर्थिक सक्षमीकरण, सबलीकरण आणि आर्थिक आधार याबाबत बचत गटांसाठी मार्गदर्शक ठरणार आहे. बचत गटाची स्थापना जानेवारी २०१३ मध्ये अवघ्या दोन सदस्यांपासून झाली होती. आज या गटाशी १६८० हून अधिक सदस्य जोडले गेले असून वार्षिक उलाढाल ११ कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे. वाढत्या विस्तारामुळे गटाचे कार्यक्षेत्र संपूर्ण भारतभर करण्यात आले असून त्याचे 'अर्थ आधार शक्ती फेडरल बचत गट' असे नामकरण करण्यात आले आहे.

बचत गटाच्या नियमावलीमध्ये सदस्यत्व, संघटन रचना, कार्यपद्धती, कर्ज वितरण, परतफेड व्यवस्था, विशेष योजना, नफा वितरण प्रणाली आणि सदस्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी विविध उपक्रमांची सविस्तर माहिती देण्यात आली आहे. आर्थिक बचत, गुंतवणूक, उद्योग, व्यवसाय, कृषी, शिक्षण, आरोग्य आणि सेवा क्षेत्रांमध्ये सदस्यांचा सहभाग वाढवून त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्याचे उद्दिष्ट गटाने ठेवले आहे.

'सर्वांच्या श्रीमंतीत आपली श्रीमंती आणि आपल्या श्रीमंतीतून सर्वांची श्रीमंती' या तत्त्वावर कार्यरत असलेला हा बचत गट आर्थिक शोषणमुक्त, स्वावलंबी आणि कल्याणकारी समाजव्यवस्था उभारण्याच्या दिशेने कार्यरत आहे. आर्थिक साक्षरता, पारदर्शकता, शिस्त, आत्मविश्वास आणि स्वयंप्रेरणा यांचा विकास करून सदस्यांचे शाश्वत आर्थिक कल्याण साधण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. मेळावा यशस्वी करण्यासाठी बचत गटाचे सर्व पदाधिकारी, संचालक मंडळ, संघटक आणि सदस्य प्रयत्नशील असून मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# छायाताई फिरोदिया यांचे कार्य समाजासाठी प्रेरणादायी – शैलेश मुनोत

**छायाताई फिरोदिया यांचा वाढदिवसानिमित्त जय आनंद महावीर युचक मंडळातर्फे सत्कार**



**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगरमधील फिरोदिया परिवाराने शहराच्या सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रात अतुलनीय योगदान दिलेले आहे. राज्यात नावलौकिक असलेल्या अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या प्रगतीसाठी स्व.अशोकभाऊ फिरोदिया यांनी अथक परिश्रम घेतले. त्यांचा हाच वारसा छायाताई फिरोदिया अतिशय समर्थपणे पुढे चालवत आहेत. संस्थेच्या प्रत्येक शाळेत उच्च दर्जाची शैक्षणिक गुणवत्ता असली पाहिजे यावर त्यांचा कटाक्ष असतो. यासाठी त्या शिक्षकांना प्रेरित करतात. संस्थेचा प्रत्येक विद्यार्थी सुसंस्कारित होण्यासाठी त्या आग्रही असतात. त्यांचे कार्य समाजासाठी कायम प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन जय आनंद महावीर युवक मंडळाचे अध्यक्ष शैलेश मुनोत यांनी केले.

अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया यांचा वाढदिवसानिमित्त जय आनंद महावीर युवक मंडळाच्यावतीने अध्यक्ष शैलेश मुनोत यांनी सत्कार केला. यावेळी मंडळाचे सेक्रेटरी आनंद मुथा, कार्याध्यक्ष सत्येन मुथा, प्रमोद गांधी (पीटू) , योगेश दाणी, सुशिल शिंदे आदी उपस्थित होते.

शैलेश मुनोत पुढे म्हणाले, छायाताई फिरोदिया यांचे कार्य शैक्षणिक क्षेत्रापुरते मर्यादित नसून त्या सामाजिक कार्यातही अग्रेसर असतात. नव्या पिढीला समाजाच्या परंपरा, संस्कृतीची ओळख व्हावी, सांस्कृतिक वारसा जतन व्हावा यासाठी त्या योगदान देतात. समाजातील महिलांना एकत्र आणत पारंपरिक गणगौर उत्सव साजरा करण्यात त्या योगदान देतात. जय आनंद महावीर युवक मंडळासाठी त्या हक्काच्या मार्गदर्शक आहेत. मंडळाच्या कार्याला नेहमीच त्यांचे मोलाचे सहकार्य लाभते. त्यांना निरोगी दीर्घायुष्य लाभावे याच सदिच्छा.

छायाताई फिरोदिया म्हणाल्या, जय आनंद महावीर युवक मंडळाचे बहुतांश सभासद आमच्या संस्थेच्या शाळांचे माजी विद्यार्थी आहेत. हे सर्वजण आपापले व्यवसाय सांभाळून अतिशय निरपेक्ष वृत्तीने सामाजिक कार्य करीत असतात.

# नगर जल्लोष ट्रस्टकडून डोंगरगण व भूतकरवाडी शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**





**अहिल्यानगर–** समाजाचे आपण काही देणे लागतो, या सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेतून अहिल्यानगर येथील नगर जल्लोष ट्रस्ट परिवाराच्या वतीने ''जिल्हा परिषद प्राथमिक शाळा डोंगरगण'' व ''श्री छत्रपती शिवाजी महाराज म न पा प्राथमिक शाळा'' भूतकरवाडी, अहिल्यानगर येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमांतर्गत शाळेतील इयत्ता पहिली ते चौथीच्या सर्व विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे शालेय साहित्य प्रदान करण्यात आले.श्री छत्रपती शिवाजी महाराज म न पा प्राथमिक शाळा भूतकरवाडी येथील शाळेतील ४५ विद्यार्थ्यांना संस्थेचे लौकिक शिंगवी यांच्या वतीने शाळेचे नवीन बूट भेट देण्यात आले.शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभीच भरपूर प्रमाणात शैक्षणिक साहित्य मिळाल्याने चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि उत्साह ओसंडून वाहत होता.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. तसेच शाळेच्या वतीने पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत गुलाबाच्या पुष्परोपाचे भेटवस्तू स्वरूपात वितरण करून मान्यवरांचा आभारपूर्वक सत्कार करण्यात आला.

यावेळी नगर जल्लोष ट्रस्टचे सल्लागार समिती प्रमुख सुहासभाई मुळे, किशोर शिंगवी,अध्यक्ष सागर बोगा,विश्वस्थ लौकिकशेठ शिंगवी, सचिव अक्षय आंबेकर,सतीश चिंता,खजिनदार दीपक गुंडू,स्तिमित राशीनकर, सुमित ईप्पलपेल्ली,भूपेंद्र चव्हाण,तसेच सौ पल्लवी बोगा, झिया तेजस कु. ओवी बोगा,इत्यादी उपस्थित होते.

कार्यक्रमास गावच्या प्रथम नागरिक तथा प्रशासक सौ.वैशाली मते, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा कोमल चांदणे, उपाध्यक्ष रवींद्र कदम, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष शंकर चांदणे, गायत्री चांदणे, सुवर्णा कदम, शाळेचे उपक्रमशील शिक्षक ज्ञानेश्वर चेडे तसेच राष्ट्रीय पुरस्कार विजेते शिक्षक नारायण मंगलारम सर, मुख्याध्यापक अरुण पवार, वर्ग शिक्षिका सौ. ज्योती टाळके,यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

यावेळी वैशाली मते, शंकर चांदणे आणि अक्षय आंबेकर, अरुण पवार सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत समाजातील दानशूर वृत्ती, शिक्षणाचे महत्त्व आणि सामाजिक बांधिलकी याविषयी आपली मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्र संचालन नारायण मंगलारम सर यांनी केले.

''देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे; घेता घेता एक दिवस देणाऱ्याचे हातही घ्यावेत...!'' या विचारानुसार नगर जल्लोष परिवाराने केलेली मदत विद्यार्थ्यांमध्ये देण्याची संस्कृती व सामाजिक जाण निर्माण करणारी असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

# भटके विमुक्त–आदिवासी समाजातील एकही कुटुंब योजनांपासून वंचित राहणार नाही– जिल्हाधिकारी



**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भटके विमुक्त व आदिवासी समाजातील एकही कुटुंब शासनाच्या कल्याणकारी योजनांपासून वंचित राहणार नाही. समाजाच्या मूलभूत प्रश्नांवर प्रशासन सकारात्मक भूमिका घेऊन तातडीने कार्यवाही करेल, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले.

अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयात भटके विमुक्त आदिवासी संयोजन समिती, विविध सामाजिक संघटना आणि समाज प्रतिनिधींसोबत गुरुवारी महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत भटके विमुक्त व पारधी समाजाच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीस आदिवासी युवा क्रांती संघटना महाराष्ट्रचे अजित भोसले, भटके विमुक्त आदिवासी संयोजन समितीच्या उमाताई जाधव व संतोष भोसले, पारधी विकास कृती समितीचे विशाल पवार व तुकाराम पवार, ग्रामीण विकास केंद्रच्या शितल काळे तसेच सहारा सर्वांगीण विकास संस्थेसह विविध संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी अतिक्रमित घराखालची जागा नियमानुसार संबंधित कुटुंबांच्या नावावर करण्याबाबत प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेतली. तसेच राजूर येथील आदिवासी विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या शेळी गट योजनेचा लक्षांक वाढवून अधिकाधिक लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्याबाबत चर्चा करण्यात आली.

स्वाभिमान सबलीकरण योजना पुन्हा सक्रिय करण्याबाबतही सकारात्मक निर्णय घेण्यात आला. तसेच जमीन मिळालेल्या लाभार्थ्यांना विहीर, शेततळे आणि इतर कृषी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले.

लोणी व्यंकनाथ येथील खामकरवाडी परिसरातील पारधी समाजासाठी स्वतंत्र स्मशानभूमी उपलब्ध करून देण्याबाबतही प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद दिला. याशिवाय जातीचे दाखले, रेशन कार्ड, आधार कार्ड यांसारखी आवश्यक कागदपत्रे गृहचौकशीच्या आधारे सुलभ पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर चर्चा झाली.

या बैठकीसंदर्भात यापूर्वी आदिवासी युवा क्रांती संघटनेचे अजित भोसले यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले होते. त्यानुसार दुपारी १ वाजता सुमारे एक तास ही बैठक पार पडली.

# शिक्षक भारतीचा एल्गार: रयत शिक्षण संस्थेतील दिव्यांग शिक्षकांच्या हक्कांची पायमल्ली

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** रयत शिक्षण संस्थेतील दिव्यांग शिक्षकांच्या ४ टक्के आरक्षणाची अंमलबजावणी करण्याऐवजी, सेवानिवृत्त न्यायाधीश केतकर यांची समिती केवळ वेळकाढूपणा करून शिक्षकांना हक्काच्या पगारापासून वंचित ठेवत असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. या प्रशासकीय उदासिनतेविरुद्ध शिक्षक भारती संघटनेने आक्रमक पवित्रा घेत थेट मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे.

**दिव्यांग शिक्षकांचा न्याय्य हक्क डावलला**

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ आणि महाराष्ट्र शासनाच्या २० एप्रिल २०२३ च्या शासन निर्णयानुसार, दिव्यांग शिक्षकांसाठी ४ टक्के आरक्षण देणे बंधनकारक आहे. मात्र, रयत शिक्षण संस्था कन्सेन्ट टर्म्सच्या ( ) नावाखाली या कायदेशीर तरतुदींना बगल देत असल्याचे स्पष्ट झाले आहे. शिक्षक अरुण परशुराम कदम यांच्यासारख्या अनेक दिव्यांग शिक्षकांनी न्यायालयातून आणि शिक्षण उपसंचालकांकडून आदेश आणूनही, संस्थेने त्यांना नियुक्ती न देता टाळाटाळ सुरू ठेवली आहे.

**केतकर समितीच्या भूमिकेवर संशय**

पुणे विभाग शिक्षक भारतीचे कार्याध्यक्ष महेश पाडेकर यांच्या निवेदनानुसार, रयत शिक्षण संस्थेतील सेवाविषयक प्रश्न सोडवण्यासाठी नेमलेली सेवानिवृत्त न्यायाधीश केतकर समिती सुनावण्या वारंवार पुढे ढकलत आहे. मुदतवाढ देऊनही अहवाल सादर न केल्यामुळे, ही समिती न्याय मिळवून देण्याऐवजी संस्थेच्या सोयीस्कर धोरणांना खतपाणी घालत असल्याची संतप्त भावना शिक्षक वर्गात आहे.

**न्यायालयाकडे कारवाईची मागणी**

या प्रकरणात शिक्षक भारती संघटनेने मा. मुख्य न्यायमूर्ती, उच्च न्यायालय मुंबई यांच्याकडे धाव घेऊन, परिस्थितीची गांभीर्याने दखल घेत सुओ मोटो (   – स्वतःहून) कारवाई करण्याची विनंती केली आहे. समितीच्या कार्यपद्धतीची चौकशी करून, थकीत वेतन व्याजासह शिक्षकांच्या खात्यात जमा करावे आणि दिव्यांग शिक्षकांना त्यांच्या हक्काची नियुक्ती द्यावी, अशी आग्रही मागणी संघटनेने केली आहे.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे नवजात शिशू व बालरोग तज्ज्ञ डॉ. निखिलकुमार गुट्टे पूर्णवेळ उपलब्ध



अहिल्यानगर- जैन सोशल फेडरेशन संचालित आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे अद्ययावत सुविधा असलेला नवजात शिशू व बालरोग विभाग कार्यरत आहे. या विभागात आता अनुभवी नवजात शिशू व बालरोग तज्ज्ञ डॉ. निखिलकुमार गुट्टे पूर्णवेळ रूजू झाले आहेत. नवजात बाळांच्या विविध आजारांवर डॉ. गुट्टे योग्य निदान व उपचार मार्गदर्शन करत आहेत.मुदतीपूर्वी जन्मलेल्या बाळाचे वजन कमी असणे, आईच्या पोटात शी करणे, कावीळ, जन्मल्यानंतर न रडणे, झटके येत असणे अशा विविध आजारांवर डॉ. गुट्टे यांचा प्रभावी उपचार करण्यात हातखंडा आहे. हॉस्पिटलमध्ये शासनाच्या महात्मा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत उपचार सुविधा उपलब्ध आहे. अद्ययावत एनआयसीयू याठिकाणी आहे. नवजात बाळाच्या श्वासोच्छवासाच्या त्रासावर उपचार, बालदमा ए.आर.डी.एस.(श्वसन दाह), नवजात बालकांच्या काविळीसाठी फोटो थेरपी व रक्त बदलण्याची सुविधा, अनुवंशिक आजार व जन्मजात आजारांचे निदान व उपचार मार्गदर्शन, बालदमा तसेच लहान मुलांचे टू डी इको, एक्स रे, पॅथोलॉजी लॅब २४ तास उपलब्ध आहे. नवजात शिशू व बालरोग तज्ज्ञ डॉ. निखिलकुमार गुट्टे मूळचे बीड जिल्ह्यातील आहेत. त्यांनी लातूर येथील एम.आय.एम. एस. आर. मेडिकल कॉलेजमध्ये एमबीबीएस केले असून मुंबई आणि अंबाजोगाई येथील मेडिकल कॉलेजमध्ये त्यांनी वैद्यकीय उच्च शिक्षण घेतले आहे. त्यांच्या उपचार मार्गदर्शनाचा लाभ घेण्यासाठी रूग्णांनी आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

### नागरदेवळे भागातील नालेसफाईला अखेर मुहूर्त

अहिल्यानगर - नागरदेवळे परिसरातील नागरिकांच्या जिव्हाळ्याचा आणि अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेला नालेसफाईचा प्रश्न अखेर मार्गी लागला असून मंगळवार (दि. १७ जून) रोजी नालेसफाईच्या कामास प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आली. भिंगार शहर कॉंग्रेसचे माजी अध्यक्ष सागर चाबुकस्वार यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे प्रशासनाने या गंभीर प्रश्नाची दखल घेत कारवाई केल्याने परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. पावसाळ्याला सुरुवात झाल्यानंतरही नागरदेवळे भागातील नाल्यांची साफसफाई न झाल्याने नागरिकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत होते. नाल्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर गाळ, कचरा आणि झुडपे साचल्यामुळे पाण्याचा निचरा होत नव्हता. यामुळे परिसरात दुर्गंधी पसरत होती. तसेच साप, अजगर आणि इतर सरपटणारे प्राणी नाल्यांमध्ये आढळत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. विशेषतः लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला होता. या गंभीर समस्येबाबत सागर चाबुकस्वार यांनी २२ मे २०२६ रोजी ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी नेताजी भांबड यांची भेट घेऊन नालेसफाई तातडीने करण्यात यावी, अशी मागणी करणारे निवेदन सादर केले होते. पावसाळ्यापूर्वीच नालेसफाई पूर्ण होणे आवश्यक असल्याचे त्यांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले होते. यावेळी ग्रामविकास अधिकारी भांबड यांनी लवकरच काम सुरू करण्याचे आश्वासन दिले होते. नालेसफाईचे काम सुरू झाल्यानंतर नागरदेवळे परिसरातील नागरिकांनी आनंद व्यक्त केला. परिसरातील रहिवाशांनी सागर चाबुकस्वार यांच्या चिकाटीचे व जनहिताच्या प्रश्नांबाबत घेतलेल्या भूमिकेचे कौतुक केले. तसेच ग्रामविकास अधिकारी नेताजी भांबड आणि माजी सरपंच राम पानमळकर यांनीही या कामासाठी सहकार्य केल्याबद्दल त्यांचे आभार मानले. नालेसफाईमुळे पावसाळ्यात होणारी पाणी साचण्याची समस्या कमी होण्यास मदत होणार असून डासांची उत्पत्ती, दुर्गंधी आणि सरपटणाऱ्या प्राण्यांचा धोका कमी होईल, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे. स्थानिक पातळीवरील प्रश्न सोडविण्यासाठी लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांच्यातील समन्वय महत्त्वाचा असल्याचे या निमित्ताने पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

## 'संत निरंकारी मिशनच्या वतीने रविवारी १५००हून अधिक ठिकाणी साजरा होणार 'आंतरराष्ट्रीय योग दिवस'




दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** 'निरोगी शरीर, निर्मळ मन आणि सजग आत्मा' या पवित्र संकल्पाला प्रत्यक्षात साकार करत संत निरंकारी मिशन आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने एक व्यापक योग व आध्यात्मिक चेतना अभियान आयोजित करत आहे. सतगुरु माता सुदीक्षा जी महाराज यांच्या पावन आशीर्वाद आणि दूरदर्शी मार्गदर्शनाखाली राबवले जाणारे हे प्रेरणादायी अभियान मानवकल्याण, समग्र आरोग्य आणि आत्मिक उन्नतीच्या दिशेने एक अर्थपूर्ण पाऊल आहे.

याच प्रेरणादायी भावनेनुसार जागतिक योग दिनाच्या निमित्ताने संत निरंकारी मिशनतर्फे रविवार, २१ जून २०२६ रोजी सकाळी भारतभरातील १५०० हून अधिक केंद्रांवर एकाच वेळी योग शिबिरांचे आयोजन केले जाणार आहे. मिशनच्या विविध शाखांमध्ये स्थानिक योग प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सत्संग भवन, मोकळ्या मैदानांमध्ये आणि उद्यानांमध्ये होणाऱ्या या कार्यक्रमांमध्ये श्रद्धाळू, सेवादल स्वयंसेवक आणि स्थानिक नागरिक उत्साहाने सहभागी होतील.

मिशनच्या नगर शाखेच्या वतीने सुद्धा रविवारी सकाळी ७ ते ८ या वेळेत संत निरंकारी सत्संग भवनच्या प्रांगणात, मिस्किन रोड येथे तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली सामूहिक योगासने करण्यात येईल.

संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनचे सचिव जोगिंदर सुखीजा जी यांनी सांगितले की २०१५ पासून फाउंडेशनतर्फे 'योग दिवस' हा राष्ट्रव्यापी अभियान नियमितपणे राबवला जात आहे. योग ही भारताची प्राचीन आणि गौरवशाली परंपरा आहे, जी केवळ शरीर मजबूत करत नाही तर मनाला स्थिरता, विचारांना सकारात्मकता आणि आत्म्याला चेतना प्रदान करते. नियमित योगाभ्यासामुळे तणाव आणि जीवनशैलीशी संबंधित समस्यांवर नियंत्रण मिळवता येते आणि व्यक्ती आत्मिक समाधान, मानसिक आनंद आणि सामाजिक सद्भावाच्या दिशेने अग्रेसर होतो.

## महाधडाका! नामदार भरतशेठ गोगावले यांचे पीए मनोज जाधव यांना राज्य शासनाचा मानाचा कृषी सेवारत्न पुरस्कार जाहीर!

### जलसंधारण, शेती प्रयोग आणि लोकाभिमुख सेवेची मोठी पावती; १ जुलै रोजी होणार गौरव!

कमलेश गायकवाड

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाचा अत्यंत प्रतिष्ठेचा आणि आदराचा मानला जाणारा ''पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवारत्न पुरस्कार'' यंदा नामदार भरतशेठ गोगावले यांचे स्वीय सहाय्यक तथा सहायक कृषी अधिकारी श्री. मनोज सुमन मोहन जाधव यांना जाहीर झाला आहे. जाधव यांच्या कृषी क्षेत्रातील उत्तुंग कामगिरीची, अद्वितीय प्रयोगांची आणि अहोरात्र चालणाऱ्या शेतकरी सेवेची दखल घेत राज्य सरकारने हा सर्वोच्च सन्मान जाहीर केला असून, आगामी १ जुलै रोजी कृषी दिनाच्या शुभमुहूर्तावर हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. या घोषणेमुळे महाराष्ट्राच्या कृषी वर्तुळात आनंदाला उधाण आले असून, युवा कृषी अधिकाऱ्यांमध्ये एक नवा उत्साह संचारला आहे.

शेतकऱ्यांचे कैवारी अन् प्रयोगांचे चक्रवर्ती: मनोज जाधव यांचे क्रांतीकारी कार्य!

श्री. मनोज जाधव यांनी केवळ शासकीय नोकरी न करता, कृषी क्षेत्राला एका वेगळ्या उंचीवर नेण्याचे काम केले आहे. त्यांच्या कार्यकाळातील काही मैलाचे दगड खालीलप्रमाणे आहेत:

जलकुंड आणि भात शेतीचे यशस्वी प्रयोग:पोलादपूर तालुक्यातील गोळेगणी येथे



त्यांनी जलकुंड उपचार आधारित फळबाग लागवडीचा अत्यंत अभिनव प्रयोग यशस्वी केला, ज्याची दखल थेट शासनाला घ्यावी लागली. तसेच देवपूर येथे *भात टोकन शेतीचा यशस्वी पॅटर्न राबवून त्यांनी भात उत्पादक शेतकऱ्यांसमोर नवा आदर्श ठेवला.

जलसंधारणात अव्वल कामगिरी: देवळे गावाला प्री वॉटर कप स्पर्धेत जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवून देण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. जलयुक्त शिवार आणि मृदसंवर्धनाच्या कामात सलग चार वर्षे त्यांनी जनतेला सोबत घेऊन जलक्रांती घडवून आणली.

आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना नवजीवन: यवतमाळ सारख्या संवेदनशील जिल्ह्यातील अंजनखेड, शारी आणि राणी धानोरा या गावांमध्ये जाऊन त्यांनी आत्महत्याग्रस्त व आर्थिकदृष्ट्या दुर्बल शेतकरी कुटुंबांना आधुनिक व शाश्वत शेतीचे धडे दिले. त्यांच्या या मार्गदर्शनामुळे अनेक कोमेजलेली पिके आणि संसार पुन्हा हसले.

महाराष्ट्रभर कृषी सल्लागार म्हणून नावलौकिक: आंबा घन लागवड, स्ट्रॉबेरी उत्पादन आणि आधुनिक बागायती व्यवस्थापनात त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रात तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून स्वतः ची वेगळी ओळख निर्माण केली आहे.

सत्तेच्या केंद्रात राहूनही जपली सामान्यांची नाळ!

नामदार भरतशेठ गोगावले यांचे स्वीय सहाय्यक म्हणून काम करताना मनोज जाधव यांनी कधीही आपल्यातील कृषी अधिकारी आणि समाजसेवक मागे पडू दिला नाही. मंत्रालयापासून ते थेट शेताच्या बांधापर्यंत येणाऱ्या प्रत्येक सर्वसामान्य नागरिकाला, शेतकऱ्याला तत्परतेने मदत करणे हा त्यांचा स्वभाव राहिला आहे. त्यांची अभ्यासू वृत्ती, कर्तव्यदक्षता आणि अजातशत्रू व्यक्तिमत्त्व यामुळेच आज कृषी विभाग आणि राजकीय-सामाजिक स्तरावर त्यांच्याबद्दल प्रचंड आदराची भावना आहे.

**अभिनंदनाचा महापूर!**

पुरस्काराची घोषणा होताच राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि कृषी क्षेत्रातील दिग्गज नेत्यांनी तसेच राज्यातील लाखो शेतकऱ्यांनी श्री. मनोज जाधव यांच्यावर कौतुकाचा वर्षाव केला आहे. हा पुरस्कार म्हणजे एका खऱ्या कृषी योद्ध्याचा सन्मान असल्याची भावना व्यक्त होत आहे.

## पैठणमधील नऊ जिल्हा परिषद शाळांना वर्गवाढ व दर्जावाढीस मंजुरी

### आमदार विलास पाटील भुमरे यांच्या प्रयत्नांना यश

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण –** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेमार्फत पैठण तालुक्यातील नऊ जिल्हा परिषद शाळांना वर्गवाढ व दर्जावाढीस मंजुरी मिळाली आहे. या निर्णयामुळे ग्रामीण व तांडा भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी अन्य गावांचा आधार घ्यावा लागणार नसून शिक्षणाची सुविधा त्यांच्या गावातच उपलब्ध होणार आहे.

मंजुरी मिळालेल्या शाळांमध्ये मेहेरबान नाईक तांडा व कडेठाण बुद्रुक येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांना पाचवी, तांदुळवाडी शाळेला सहावी, बिडकीन शाळेला सातवी, मुधलवाडी, रांजणगाव दांडगा व पिंपळवाडी शाळांना आठवी, रहाटगाव शाळेला नववी तर ढोरकिन उर्दू शाळेला दहावी वर्ग सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे.



राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण व सातत्यपूर्ण शिक्षण उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे. वर्गवाढ व दर्जावाढीमुळे विद्यार्थ्यांची शाळा गळती कमी होण्यास मदत होणार असून मुलांना उच्च शिक्षणासाठी दूरवर जावे लागणार नाही.

या मंजुरीसाठी आमदार विलास (बापू) पाटील भुमरे यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नांमुळेच पैठण तालुक्यातील या शाळांना मंजुरी मिळाल्याची भावना स्थानिक नागरिक, पालक व शिक्षकांनी व्यक्त केली आहे. या निर्णयाचे तालुकाभर स्वागत होत असून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी हे महत्त्वाचे पाऊल ठरणार असल्याचे मत ग्रामस्थांनी व्यक्त केले आहे. ग्रामीण भागातील शिक्षण बळकट करण्यासाठी शासनाने घेतलेल्या या निर्णयामुळे विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्याला नवी दिशा मिळणार आहे.

## आय.एम.एस.सी.डी.आर.मध्ये 'निरोगी जीवनाचा मंत्र : योग, आहार आणि सकारात्मक मानसिकता' विषयावरील राष्ट्रीय वेबिनार

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** बी.पी.एच.ई. सोसायटीच्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज करिअर डेव्हलपमेंट अँड रिसर्च (आय.एम.एस.सी.डी. आर.), अहिल्यानगर येथे 'आंतरराष्ट्रीय योग दिना'निमित्त आय.एम. एस. विद्यार्थीनी मंच आणि लर्निंग रिसोर्स सेंटर (ग्रंथालय) यांच्या संयुक्त विद्यमाने 'नरिश टू फ्लरिश : हाऊ फूड, मूव्हमेंट अँड माइंडसेट वर्क टुगेदर फॉर होल-बॉडी वेलनेस' या विषयावरील राष्ट्रीय वेबिनार उत्साहात संपन्न झाला. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये अधोरेखित करण्यात आलेल्या सर्वांगीण शिक्षण, आरोग्य आणि कल्याणाच्या संकल्पनेशी सुसंगत असा हा वेबिनार होता. योगासारख्या पारंपरिक ज्ञानप्रणालींची आधुनिक आरोग्यविषयक पद्धतींसोबत सांगड घालून संतुलित जीवनशैलीचा प्रसार करण्याचा उद्देश या कार्यक्रमामागे होता.



या वेबिनारसाठी 'द नरिशमेंट ओएसिस'च्या आहारतज्ज्ञ सौ. ध्रुवी जैन या प्रमुख साधनतज्ज्ञ म्हणून उपस्थित होत्या. त्या क्लिनिकल न्यूट्रिशन एक्स्पर्ट, हेल्थ स्पेशालिस्ट, हार्मोन हेल्थ अँड फंक्शनल न्यूट्रिशन प्रॅक्टिशनर तसेच प्रमाणित मधुमेह शिक्षिका आहेत. पोषणशास्त्र, व्यायाम, योगाधारित आरोग्य व्यवस्थापन, हार्मोनल आरोग्य, गट हेल्थ आणि मधुमेह व्यवस्थापन या क्षेत्रांतील त्यांना समृद्ध अनुभव आहे. सौ. जैन यांनी आपल्या सादरीकरणामध्ये मन, शरीर आणि आत्मा यांच्यातील परस्परसंबंध समजून घेण्याचे तसेच त्यांचे संतुलित एकत्रीकरण साधण्याचे महत्त्व अधोरेखित केले. सर्वांगीण आरोग्य प्राप्त करण्यासाठी या तिन्ही घटकांमध्ये समन्वय असणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यांनी आरोग्याचे तीन प्रमुख स्तंभ म्हणजे हालचाल, आहार आणि मन याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. शारीरिक तंदुरुस्ती आणि उत्तम आरोग्यासाठी योग, शक्तिवर्धक व्यायाम तसेच हृदयविकारासाठी उपयुक्त व्यायाम यांचे महत्त्व त्यांनी विशद केले. संतुलित आहार, सजगपणे आहार घेण्याच्या सवयी आणि अन्नाशी निरोगी नाते विकसित करण्याचे महत्त्वही त्यांनी उलगडून सांगितले. मानसिक आरोग्य जपण्यासाठी मन शांत ठेवणाऱ्या विविध कृती, निरोगी सकाळची दिनचर्या आणि शांतता, विश्रांती तसेच मज्जासंस्थेचे संतुलन राखणारी सायंकालीन दिनचर्या यांविषयी त्यांनी उपयुक्त मार्गदर्शन केले. तणाव व्यवस्थापन, वैयक्तिक गरजांनुसार आहार नियोजन आणि संतुलित जीवनशैली अंगीकारण्यासाठी उपयुक्त अशा अनेक व्यावहारिक टिप्स त्यांनी दिल्या. जीवनशैलीत एकदम मोठे बदल करण्याऐवजी एकावेळी एक चांगली सवय अंगीकारून योग्य दिशेने सातत्याने वाटचाल करावी, त्यामुळे आरोग्य आणि जीवनमानामध्ये सकारात्मक बदल अनुभवता येतात, असा मोलाचा संदेश त्यांनी सहभागींना दिला. कार्यक्रमाच्या शेवटी प्रश्नोत्तरांचे परस्परसंवादी सत्र आयोजित करण्यात आले. यामध्ये सहभागी सदस्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आरोग्य, पोषण, तंदुरुस्ती आणि जीवनशैली व्यवस्थापनासंदर्भातील विविध प्रश्न विचारले व तज्ज्ञांकडून मार्गदर्शन प्राप्त केले. या संवादात्मक सत्राला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

वेबिनारचे आयोजन संस्थेचे संचालक डॉ. एम. बी. मेहता यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. त्यांनी साधनतज्ज्ञ व सहभागींचे स्वागत केले.

## कष्टी येथील परिक्रमा फॅकल्टी ऑफ फार्मसी महाविद्यालयातील ४९ विद्यार्थिनींची नामांकित कंपन्यांमध्ये निवड




दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**श्रीगोंदा–** श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी येथील मा.श्री.बबनरावजी पाचपुते विचारधारा ट्रस्ट चे परिक्रमा शैक्षणिक संकुलातील परिक्रमा फॅकल्टी ऑफ फार्मसी महाविद्यालयाचे नाव संपूर्ण महाराष्ट्रभर गाजत आहे, येथील शिक्षणाचा दर्जा, उत्कृष्ठ वसतिगृह तसेच इतर असणाऱ्या सुविधा त्यामुळे महाराष्ट्रातून विद्यार्थी विद्यार्थिनी येथे शिक्षणासाठी प्रवेश घेत आहेत, त्यातच या महाविद्यालयातील विद्यार्थिनींची एजिओ फार्मा.भोसरी, पुणे. या नामांकित कंपनीमध्ये मुलाखतीद्वारे २७ विद्यार्थिनींची व एमक्योर फार्मास्युटिकल्स पुणे.या कंपनी मध्ये २२ विद्यार्थ्यांची असे एकूण ४९ विद्यार्थ्यांची निवड झाली असून ही संस्था व विद्यार्थ्यांसाठी अत्यंत अभिमानाची व ऐतिहासिक कामगिरी ठरली आहे. आणि महाविद्यालयाची यशोगाथा कायम राखली आहे.

विद्यार्थिनींना योग्य मार्गदर्शन, सातत्यपूर्ण परिश्रम आणि आत्मविश्वासाच्या बळावर हे यश संपादन केले आहे. हे यश संस्थेच्या दर्जेदार शिक्षण पद्धतीचे आणि विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे द्योतक आहे.

परिक्रमा फॅकल्टी ऑफ फार्मसी महाविद्यालयाने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे की दर्जेदार शिक्षण व योग्य मार्गदर्शन मिळाल्यास विद्यार्थी नक्कीच यशाच्या शिखरावर पोहोचू शकतात.

येणाऱ्या काळात उत्कृष्ट आधुनिक लॅब, डिजिटल क्लासरूम, सुसज्ज असे मैदान याप्रमाणे जास्तीत जास्त सुविधासह विद्यार्थी सर्वगुण संपन्न कसा होईल याकडे नेहमी संस्थेचे मुख कार्यकारी अधिकारी ॲड. प्रतापसिंह पाचपुते हे नेहमीच प्रयत्नशील असतात.

या सर्व विद्यार्थ्यांचे प्राचार्य डॉ. सुनिल निर्मळ, ट्रेनिंग व प्लेसमेंट अधिकारी डॉ.सोनल सोलंकी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या विद्यार्थ्यांच्या निवडीमुळे विद्यार्थ्यांच्या पालकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. तसेच विद्यार्थी आणि सर्व शिक्षकांचे कौतुक होत आहे.

## कान ,नाक,घसा तपासणी शिबिरात ८० रुग्णाची तपासणी

### आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये उच्च प्रतीची रुग्णसेवा व आधुनिक पद्धतीने उपचार सुविधा उपलब्ध – डॉ.अतुल तुपे

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये नाक,कान, घसा या विभागासाठी पूर्णवेळ डॉक्टर्स उपलब्ध असून नाक कान घसा तपासणी व सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया करण्यात येत आहे.यामध्ये टॉन्सिल चे ऑपरेशन, नाकाच्या हाडाची शस्त्रक्रिया, कानाच्या पडद्याची शस्त्रक्रिया, अश्रू वाहिनी संसर्ग शस्त्रक्रिया, सायनसची शस्त्रक्रिया अशा अनेक शस्त्रक्रिया येथे केल्या जात आहे.येथे येणाऱ्या रुग्णांना आधुनिक पद्धतीने व चांगल्या दर्जाची रुग्णसेवा मिळावी यासाठी झाईस कंपनीचा मायक्रोस्कोप वापर केला जातो. येथे होणाऱ्या शिबिराचा जास्तीत जास्त रुग्णांनी लाभ घ्यावा.असे आवाहन कान,नाक, घसा तज्ञ डॉ. अतुल तुपे यांनी केले आहे.

आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये कान,नाक,घसा तपासणी



शिबिराचे उद्घाटन जैन सोशल फेडरेशनचे सर्व संचालकांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने करण्यात आले.यावेळी जैन सोशल फेडरेशनचे डॉ.प्रकाश कांकरिया,डॉ.वसंत कटारिया, सतिश लोढा,अभय गुगळे, माणकचंद कटारिया,प्रकाश छल्लाणी,डॉ.आशिष भंडारी, सुभाष मुनोत आदींसह शिबिराचे तज्ञ डॉक्टर डॉ.सुकेशिनी गाडेकर,डॉ.अतुल तुपे आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात डॉ.आशिष भंडारी म्हणाले म्हणाले,आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये महिन्यातून दोन वेळा आरोग्य शिबिरे घेतली जात आहे.समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत रुग्णसेवा मिळावी हे राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी म.सा.यांचे स्वप्न होते.चांगल्या व गुणवत्तापूर्वक मिळणाऱ्या आरोग्य सेवेसाठी जिल्ह्यातून नव्हे तर राज्यातील अनेक भागातून रुग्ण येत आहेत.येथे आलेल्या रुग्णांना सवलतीच्या दरात व मोफत उपचार मिळावे यासाठी मोठ्या प्रमाणात दानशूर व्यक्तींच्या योगदानातून शिबिरे घेतली जात आहेत.जैन सोशल फेडरेशनचे सर्व सदस्य तसेच सर्व डॉक्टर्स,स्टाफ व नर्सेस सेवाभावी वृत्तीने कार्य करीत असल्याने हॉस्पिटलचे कार्य दिवसेंदिवस वाढत आहे.कान नाक घसा तपासणी शिबिरात ८० रुग्णांची तपासणी करण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक डॉ.आशिष भंडारी यांनी केले.तर आभार प्रकाश छल्लाणी यांनी मानले.

# कठोर परिश्रम, सातत्य आणि जिद्द हेच यशाचे सूत्र - ज्ञानेश्वर खुरांगे

## दहावीच्या गुणवंतांचा आनंद विद्यालयात जल्लोषात गौरव, ९८.२० टक्के गुणांसह गार्गी ढेंगेकर अव्वल; शैक्षणिक गुणवत्तेसह क्रीडा क्षेत्रातील यशस्वी विद्यार्थ्यांचाही सन्मान



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** गुलमोहर रोड परिसरातील आनंद माध्यमिक विद्यालयात दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा तसेच विविध क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा उत्साहपूर्ण सत्कार समारंभ संपन्न झाला. गुणवंत विद्यार्थ्यांच्या यशाचा आनंद, पालकांचा अभिमान आणि शिक्षकांच्या परिश्रमांचे सार्थक अशा भावनिक वातावरणात हा सोहळा पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे हे होते. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष विनोद बजाज, सचिव किसन तरटे, श्रीमती आशा सोनवणे, दिलीप अकोलकर, विश्वनाथ पोखरकर, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती शारदा पोखरकर, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक रविंद्र अष्टेकर आदी मान्यवर उपस्थित होते.यावर्षी विद्यालयातून गार्गी ढेंगेकर हिने ९८.२० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकाविला, तर गौरी वानखरे (९४.६० टक्के) द्वितीय आणि अवंतिका माने (९४.२० टक्के) तृतीय ठरल्या. याशिवाय सेजल बोरूडे, विराज बोडखे, प्रतिक्षा धोत्रे, श्रेया अडसूळ, रोहित दातीर, सोहम काळे, अंजली डावखर, प्रिया गळगटे, नक्षत्रा गुंदेचा आणि अभिज्ञा भोर या विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांहून अधिक गुण प्राप्त करून विद्यालयाच्या यशपरंपरेत मानाचा तुरा खोवला.

क्रीडा क्षेत्रातही विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. कबड्डीपटू ज्ञानेश्वरी ढवण हिची राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल तिचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच वीरा ठोंबरे, खुशी कोंडा, श्रेया अडसूळ, फौजिया शेख आणि ओम संभार यांची अनुक्रमे जिल्हास्तरीय, विभागीय व राज्यस्तरीय स्पर्धांसाठी निवड झाल्याबद्दल त्यांचाही गौरव करण्यात आला.

यावेळी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना ज्ञानेश्वर खुरांगे म्हणाले, ''विद्यार्थ्यांच्या यशामागे सातत्यपूर्ण परिश्रम, पालकांचा विश्वास आणि शिक्षकांचे समर्पित मार्गदर्शन असते. शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच क्रीडा, कला आणि व्यक्तिमत्त्व विकास या क्षेत्रांतही विद्यार्थ्यांनी प्रगती साधणे ही काळाची गरज आहे. आनंद विद्यालयाने शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले कार्य निश्चितच प्रेरणादायी आहे.

खेळ हा केवळ मनोरंजनाचा विषय नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाचा प्रभावी पाया आहे. खेळातून शिस्त, संयम, नेतृत्वगुण, निर्णयक्षमता, संघभावना आणि प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्याची जिद्द विकसित होते. खेळ आणि अभ्यास या एकाच नाण्याच्या दोन परस्परपूरक बाजू असून विद्यार्थ्यांनी दोन्ही क्षेत्रांमध्ये समतोल साधणे आवश्यक आहे. शैक्षणिक यश महत्त्वाचे असले, तरी त्यासोबत वाचन, लेखन, संगीत, चित्रकला, वक्तृत्व, विज्ञान प्रयोग, क्रीडा आदी विविध छंद जोपासल्यास व्यक्तिमत्त्व अधिक समृद्ध आणि सक्षम बनते.


यश मिळाल्यानंतर त्याने हुरळून जाऊ नका, तसेच अपयश आले तरी खचून जाऊ नका. प्रत्येक यश हे पुढील वाटचालीची नवी जबाबदारी घेऊन येत असते. स्वतःसाठी उच्च ध्येय निश्चित करा, मोठी स्वप्ने पाहा आणि ती पूर्ण करण्याचा दृढ संकल्प करा. जिद्द, सातत्य, कठोर परिश्रम आणि सकारात्मक विचार यांच्या बळावर कोणतेही शिखर गाठणे अशक्य नाही. आजचा विद्यार्थी हा उद्याचा सक्षम नागरिक, संशोधक, क्रीडापटू, प्रशासकीय अधिकारी आणि राष्ट्रनिर्माता असणार आहे. त्यामुळे वेळेचे नियोजन, सातत्यपूर्ण प्रयत्न आणि स्वअनुशासन यांच्या आधारावर स्वतःचे भविष्य घडवा,'' असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

मुख्याध्यापिका श्रीमती शारदा पोखरकर यांनी आपल्या मनोगतात सांगितले, ''विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशामुळे विद्यालयाचा नावलौकिक अधिक उंचावला आहे. गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान हा केवळ गौरव नसून इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणारा उपक्रम आहे. विद्यार्थ्यांनी यशात नम्रता जपत भविष्यातही जिद्द, चिकाटी आणि प्रामाणिक प्रयत्नांच्या बळावर नवनवे शिखरे गाठावीत, हीच अपेक्षा आहे.'

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सौ. सीमा सोले यांनी केले. मान्यवरांचा परिचय सौ. शारदा पोखरकर यांनी करून दिला, तर आभार प्रदर्शन सौ. अर्पणा क्षीरसागर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांच्या यशाने विद्यालय परिसरात उत्साहाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले.

# पदाधिकाऱ्यांनी पक्षवाढीसाठी काम करावे - आ. काशिनाथ दाते सर

## दत्ता कुलट आणि संदीप रोहोकले यांच्यावर महत्त्वाच्या जबाबदाऱ्या



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वाढत्या जनाधाराला आणखी बळ देणारी महत्त्वपूर्ण राजकीय घडामोड पारनेर तालुक्यात घडली असून, नुकतेच मुंबई येथील षण्मुखानंद सभागृहात पक्षाच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केलेले पारनेर शहराचे माजी उपनगराध्यक्ष दत्ता कुलट आणि भाळवणी येथील उद्योजक संदीप रोहोकले यांना पक्षाच्या वतीने महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या.

> **''दत्ता कुलट आणि संदीप रोहोकले यांच्यावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने सोपविलेली जबाबदारी ही त्यांच्या दीर्घकालीन सामाजिक बांधिलकी, जनसंपर्काची पोचपावती आहे. दोघांनीही आपल्या कार्यातून समाजात विश्वासार्ह नेतृत्व निर्माण केले असून, त्यांच्या माध्यमातून पक्षाची ताकद तळागाळात अधिक प्रभावीपणे पोहोचेल. पारनेर शहर तसेच ढवळपुरी परिसरात राष्ट्रवादी काँग्रेसचे संघटन अधिक मजबूत होईल. पक्षाचे राष्ट्रीय नेतृत्व, उपमुख्यमंत्री ना. सुनेत्राताई पवार आणि आमदार काशिनाथ दाते सर यांच्या मार्गदर्शनाखाली आपण सर्वजण एकसंघपणे पक्षवाढीसाठी कार्यरत राहू.**
>
> **-प्रशांत गायकवाड**
> **(संचालक, जिल्हा बँक)**

पारनेर–नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार मा. काशिनाथ दाते सर यांच्या जनसंपर्क कार्यालयात आयोजित कार्यक्रमात दोन्ही नेत्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. मुंबई येथे पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा तथा महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री मा. सुनेत्राताई पवार आणि पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केल्यानंतर त्यांच्यावर महत्वाची जबाबदारी सोपवली. यावेळी आमदार काशिनाथ दाते सर म्हणाले, ''राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा कार्यकर्त्यांच्या कर्तृत्वाला संधी देणारा पक्ष आहे. दत्ता कुलट आणि संदीप रोहोकले यांनी सामाजिक, सार्वजनिक आणि जनसंपर्काच्या माध्यमातून लोकांमध्ये निर्माण केलेला विश्वास पक्षासाठी मोठी ताकद ठरणार आहे. त्यांचे नेतृत्व आणि कार्यक्षमतेमुळे संघटना अधिक सक्षम होईल आणि राष्ट्रवादीची विचारधारा तळागाळापर्यंत अधिक प्रभावीपणे पोहोचेल.'' यासाठी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी पक्षवाढीसाठी काम करावे. यावेळी जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य वसंतराव चेडे, तालुकाध्यक्ष विक्रम कळमकर, माजी पंचायत समिती सदस्य शंकरराव नगरे, सोनाबाई चौधरी, अशोक चेडे, राजू औटी, विकास पवार, सुनिल गाडगे, देवराम (भाऊ) ठुबे, कांतीलाल ठाणगे, शांताराम तराळ, प्रकाश (पिनू) रोहोकले, विकास रोहोकले, बाबासाहेब आमले, दिलीप रोहोकले, संदीप साळुंके, मनोहर रोहोकले, नामदेव रोहोकले, राजेंद्र जाधव, राजेंद्र मुग्दे, अरुण चौधरी यांच्यासह तालुक्यातील विविध पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. दत्ता कुलट यांना राष्ट्रवादी जिल्हा सरचिटणीस तर संदीप रोहोकले यांना जिल्हा उपाध्यक्ष पदी नेमणुक केली. भाळवणी येथील विकास रोहोकले, बाबासाहेब आमले, दिलीप रोहोकले, संदीप साळुंके, मनोहर रोहोकले, नामदेव रोहोकले, राजेंद्र जाधव, राजेंद्र मुग्दे, अरुण चौधरी या तरुणांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला.

> **''राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने माझ्यावर सोपविलेली जबाबदारी केवळ पद किंवा सन्मान नसून, वाढत्या जनाधाराच्या नव्या अध्यायाची सुरुवात आहे. आमदार काशिनाथ दाते सर यांच्या विकासाभिमुख नेतृत्वावर विश्वास ठेवून हजारो कार्यकर्ते आणि नागरिक राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाशी जोडले जात आहेत. पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा ना. सुनेत्राताई पवार व वरिष्ठ नेतृत्वाने दाखविलेला विश्वास सार्थ ठरविण्यासाठी मी अधिक जोमाने कार्य करणार आहे. भाळवणी, ढवळपुरी गटासह संपूर्ण तालुक्यात पक्ष संघटना मजबूत करून सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने लढण्याचा माझा प्रयत्न राहील.**
>
> **-संदीप रोहोकले**
> **( जिल्हा उपाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस)**

> **''राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाने माझ्यावर दाखविलेल्या विश्वासाबद्दल मी पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा ना. सुनेत्राताई पवार, आमदार काशिनाथ दाते सर तसेच पक्षातील सर्व वरिष्ठ नेत्यांचा आभारी आहे. ही नियुक्ती माझ्यासाठी सन्मानाबरोबरच मोठी जबाबदारी आहे. पक्षाची विचारधारा, विकासाची भूमिका आणि सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी मी अधिक जोमाने कार्य करणार आहे. पारनेर शहरासह संपूर्ण मतदारसंघात पक्ष संघटना अधिक बळकट करण्यासाठी कार्यकर्त्यांना सोबत घेऊन काम करेन. पक्षाने दिलेली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला अधिक मजबूत करण्यासाठी मी कटिबद्ध आहे.''**
>
> **-दत्ता कुलट**
> **(जिल्हा सरचिटणीस राष्ट्रवादी काँग्रेस)**

# अहिल्यानगरच्या औद्योगिक विकासासाठी मोठा उद्योग प्रकल्प आणावा

## जयंत येलुलकर यांची प्रधान सचिव डॉ. पी. अनबलगन यांच्याकडे मागणी




मुंबई : अहिल्यानगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत असताना जिल्ह्यातील विविध प्रश्नांमध्ये कर्तव्यभावनेने लक्ष घालणारे आणि शहराच्या ऐतिहासिक वारशाबद्दल विशेष आत्मीयता बाळगणारे महाराष्ट्र शासनाच्या उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. पी. अनबलगन यांच्याकडे अहिल्यानगरच्या औद्योगिक विकासासाठी मोठा उद्योग प्रकल्प आणण्याची मागणी रसिक ग्रुपचे अध्यक्ष तथा माजी नगरसेवक जयंत येलुलकर यांनी केली. मुंबई येथील मंत्रालयात झालेल्या भेटीत येलुलकर यांनी डॉ. अनबलगन यांना अहिल्यानगरशी असलेल्या त्यांच्या जिव्हाळ्याच्या नात्याची आठवण करून दिली. जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत असताना त्यांनी ऐतिहासिक वारसा लाभलेल्या अहिल्यानगर शहरातील भुईकोट किल्ल्याच्या संवर्धन आणि सुशोभीकरणासाठी विशेष पुढाकार घेतला होता. त्यांच्या प्रयत्नांमुळे किल्ल्याच्या विकासासाठी शासनामार्फत भरीव निधी उपलब्ध झाला होता.

यावेळी येलुलकर यांनी शहरासमोरील बेरोजगारीचा प्रश्न मांडला. एकेकाळी औद्योगिक आणि व्यावसायिकदृष्ट्या गजबजलेल्या अहिल्यानगरमधील अनेक तरुण रोजगाराच्या शोधात इतर शहरांमध्ये आणि राज्यांमध्ये स्थलांतरित होत आहेत. परिणामी शहराची ओळख हळूहळू 'पेन्शनरांचे शहर' अशी निर्माण होत असून अनेक उपनगरे तरुणांच्या अभावामुळे ओस पडत चालल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. अहिल्यानगरमधील तरुणांना स्थानिक स्तरावर रोजगार उपलब्ध व्हावा, लघु व मध्यम उद्योजकांना कामाच्या संधी निर्माण व्हाव्यात आणि शहराच्या आर्थिक विकासाला चालना मिळावी यासाठी एमआयडीसी परिसरात मोठा उद्योग प्रकल्प उभारण्याचा पाठपुरावा करावा, अशी विनंती त्यांनी डॉ. अनबलगन यांच्याकडे केली. अशा प्रकल्पामुळे चार ते पाच हजार तरुणांना रोजगार उपलब्ध होऊन शहराला नवसंजीवनी मिळेल, असे त्यांनी सांगितले.

सध्या महाराष्ट्र शासनाच्या उद्योग विभागात प्रधान सचिव या महत्त्वाच्या पदावर कार्यरत असलेले डॉ. पी. अनबलगन हे राज्यातील कर्तबगार आणि दूरदृष्टी असलेले प्रशासकीय अधिकारी म्हणून ओळखले जातात. भेटीदरम्यान त्यांनी अहिल्यानगरच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. रसिक ग्रुपच्या गुढीपाडवा सांस्कृतिक महोत्सवासाठी त्यांनी पूर्वी विशेष सहकार्य केले होते. तसेच शहरातील विविध सांस्कृतिक, पर्यटन आणि सामाजिक उपक्रमांना त्यांनी नेहमीच सकारात्मक प्रतिसाद दिला होता.

अहिल्यानगरच्या औद्योगिक प्रगतीसाठी डॉ. पी. अनबलगन निश्चितच सकारात्मक भूमिका घेतील आणि शहराच्या विकासासाठी आवश्यक ते सहकार्य करतील, असा विश्वास जयंत येलुलकर यांनी व्यक्त केला.

# गणपतीपुळे दुर्घटनेतील बेपत्ता पर्यटकांच्या शोधासाठी आमदार भुमरे सक्रिय



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** रत्नागिरी जिल्ह्यातील गणपतीपुळे समुद्रात बेपत्ता झालेल्या पैठण तालुक्यातील बिडकीन येथील पाच पर्यटकांच्या घटनेची माहिती मिळताच पैठणचे आमदार विलासराव भुमरे यांनी तातडीने दखल घेतली आहे. त्यांनी रत्नागिरी जिल्हा प्रशासन, पोलीस यंत्रणा तसेच आपत्ती व्यवस्थापन विभागातील अधिकाऱ्यांशी संपर्क साधून शोधमोहिमेबाबत माहिती घेतली.

बिडकीन येथील पाच नागरिक समुद्रात बेपत्ता झाल्याने परिसरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर आमदार भुमरे यांनी प्रशासनाला शोधकार्य अधिक गतीने राबविण्याच्या सूचना केल्या असून बेपत्ता पर्यटकांचा शोध लागेपर्यंत परिस्थितीवर लक्ष ठेवणार असल्याचे सांगितले.

दरम्यान, गणपतीपुळे येथे स्थानिक प्रशासन, पोलीस, जीवरक्षक आणि नागरिकांच्या मदतीने युद्धपातळीवर शोधमोहीम सुरू असून समुद्रातील प्रबळ प्रवाहामुळे बचावकार्यात अडचणी येत आहेत. बेपत्ता पर्यटक सुखरूप सापडावेत, अशी अपेक्षा त्यांच्या नातेवाईकांसह परिसरातील नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

# अहिल्यानगर महानगरपालिका आरोग्य विभागाच्या वतीने आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात

## कविता खिलारी सिस्टर यांनी दिले योगाचे प्रत्यक्ष धडे; आशा सेविका व आरोग्य कर्मचाऱ्यांना सुदृढ आरोग्याचा संदेश



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिका आरोग्य विभागाच्या वतीने आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात आशा सेविका, सिस्टर्स आणि आरोग्य कर्मचाऱ्यांना योगाचे महत्त्व पटवून देत प्रत्यक्ष योग प्रशिक्षण देण्यात आले. कार्यक्रमात कविता खिलारी सिस्टर यांनी विविध योगासने, प्राणायाम आणि आरोग्यविषयक योगप्रकारांचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक सादर करून उपस्थितांना सुदृढ व निरोगी जीवनाचा संदेश दिला.

या कार्यक्रमास मनपा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजूरकर, डॉ. वृषाली आरू, कविता खिलारी, विकास गीते, भाऊसाहेब सुडके यांच्यासह आशा सेविका, सिस्टर्स आणि आरोग्य विभागातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना मनपा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजूरकर म्हणाले की, ''आंतरराष्ट्रीय योग दिन हा केवळ एका दिवसापुरता मर्यादित न राहता प्रत्येक नागरिकाने आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग म्हणून योगाचा स्वीकार केला पाहिजे. योगामुळे शरीर आणि मन निरोगी राहते. सध्याच्या धकाधकीच्या जीवनशैलीत तणावमुक्त आणि उत्साही राहण्यासाठी योग अत्यंत आवश्यक आहे. नियमित योगाभ्यास केल्याने शारीरिक तसेच मानसिक आरोग्य सुधारते आणि जीवन अधिक आनंदी व संतुलित बनते.

कार्यक्रमात उपस्थित आशा सेविका आणि आरोग्य कर्मचाऱ्यांनी विविध योगासनांचा सराव करत योगाचे महत्त्व जाणून घेतले. योगाच्या माध्यमातून आरोग्य संवर्धन, रोगप्रतिकारक शक्ती वाढविणे आणि निरोगी जीवनशैलीचा स्वीकार करण्याचा संदेश देण्यात आला.

(पान १ वरून)

## संभाजी ब्रिगेडच्या 'आली मरीआई' आंदोलनापुढे प्रशासन नमले, उच्चस्तरीय चौकशीचे आदेश

झाला तर संभाजी ब्रिगेड यापेक्षाही अधिक तीव्र जनआंदोलन उभारेल, असा इशारा जिल्हाध्यक्ष राजेशदादा परकाळे यांनी दिला.यावेळी राजेशदादा परकाळे (जिल्हाध्यक्ष), दिलीप आबा वाळुंज (जिल्हाध्यक्ष, शेतकरी आघाडी), सुदाम कोरडे (जिल्हा उपाध्यक्ष), शामभाऊ जरे (श्रीगोंदा तालुकाध्यक्ष), सचिन काकडे (तालुकाध्यक्ष, पारनेर), महेश दानवे (तालुकाध्यक्ष, नगर), उत्तम घोगरे (तालुकाध्यक्ष, शेतकरी आघाडी), सद्दाम शेख (तालुकाध्यक्ष, अल्पसंख्याक आघाडी), अक्षय दहातोंडे (श्रीगोंदा शहराध्यक्ष), दिलीप लबडे (तालुका उपाध्यक्ष), पांडुरंग खोरे (उपाध्यक्ष, शेतकरी आघाडी), बापू जगताप (तालुका कार्याध्यक्ष), रवींद्र महांडुळे (तालुका सचिव), संदीप मांडोळे (उपसचिव), प्रदीप दरेकर (तालुका संघटक), संतोष आरडे (मेजर, संघटक) तसेच भीमराज कोकाटे, संदीप मांढरे, शशिकांत आण्णा पवार, अविनाश मेढे, संतोष कोकाटे यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

## सोनगाव सात्रळ शिवारात रेशनिंगचा काळाबाजार उघड

असे सांगितले. गोदामाची झडती घेतली असता, तिथे मोठ्या प्रमाणावर शासकीय धान्याचा साठा आणि दोन वाहने मिळून आली. आरोपीने हा गहू व तांदूळ आजूबाजूच्या रेशनिंग दुकानातून काळ्याबाजाराने खरेदी केल्याची कबुली दिली. पथकाने २ लाख ९ हजार ७०० रुपये किमतीचा ६,९९० किलो (१२१ गोण्या) गहू,२ लाख ९३ हजार रुपये किमतीचा ५,८६० किलो (११७ गोण्या) तांदूळ व सात लाख रुपये किमतीची दोन चारचाकी वाहने असा एकूण १२ लाख २ हजार ७०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी आरोपीविरुद्ध राहुरी पोलीस ठाण्यात जीवनावश्यक वस्तू अधिनियम कलम ३ व ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## सुपा हद्दीतील दोन हॉटेल्सवरछाप्यात पाच महिलांची सुटका

ठाण्याच्या प्रभारी अधिकारी ज्योती गडकरी व गुन्हे शाखेच्या संयुक्त पथकाने बनावट ग्राहक पाठवून खात्री केली व दोन्ही ठिकाणी छापे टाकले. या दोन्ही कारवायांमध्ये आरोपींकडून ३७ हजार रुपये किमतीचे ३ मोबाईल आणि रोकड जप्त करण्यात आली. याप्रकरणी पोलीस अंमलदार अतुल लोटके यांच्या फिर्यादीवरून सुपा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ९९ आणि स्त्रिया व मुलींचे अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा (पिटा) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुपा पोलीस करत आहेत.

## सरसकट कर्जमाफीसाठी २३ जूनला पारनेर तहसीलवर जनआक्रोश मोर्चा

ऐतिहासिक आणि अभूतपूर्व करण्याचे आवाहनही खासदार लंके यांनी केले. तालुक्यातील प्रत्येक गावातून मोठ्या संख्येने शेतकरी, युवक, महिला आणि नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

मोर्चाच्या अनुषंगाने गावोगावी जनजागृती करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. मोर्चामध्ये जास्तीत जास्त शेतकऱ्यांचा सहभाग व्हावा यासाठी विविध जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या. प्रसिद्धी, संपर्क, वाहतूक आणि शिस्त याबाबत स्वतंत्र नियोजन करण्यात आले असून कार्यकर्त्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या.

बैठकीच्या शेवटी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सर्व संघटना, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध राजकीय पक्षांनी एकजुटीने लढा उभारण्याचा निर्धार व्यक्त केला. त्यामुळे २३ जून रोजी होणाऱ्या जनआक्रोश मोर्चाकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले असून या आंदोलनाला मोठा प्रतिसाद मिळण्याची चिन्हे दिसत आहेत.

## मजबूत पक्ष बांधणी करून अहिल्यानगर शहरावर शिवसेनेचा भगवा पुन्हा फडकवू : किरण काळे

आली. यावेळी ते बोलत होते. यावेळी उपजिल्हाप्रमुख रावजी नांगरे, उपजिल्हाप्रमुख दीपक भोसले, उपशहर प्रमुख मनोज गुंदेचा, अल्पसंख्यांक आघाडीचे अनिस चुडीवाला, कामगार आघाडीचे जिल्हाप्रमुख विलास उबाळे, प्रतीक बारसे, महिला आघाडीच्या उषा भगत, शारदा वाघमारे, मीना घाटगे, शैला लांडे, व्यापारी आघाडीचे विकेश गुंदेचा, बाळासाहेब जरे, सुजय लांडे, ऋतुराज आमले, शंकर आव्हाड, गणेश आपरे, राम धोत्रे, आकाश अल्हाट, विकास भिंगारदिवे, महावीर मुथा, किशोर कोतकर, आप्पा लांडगे, विनोद शिरसाट, बाबासाहेब वैरागर, जयराम आखाडे, धनंजय देशमुख आदींसह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

काळे म्हणाले, आतापासूनच लोकसभा, विधानसभा निवडणुकीची तयारी करावी लागेल. पुन्हा एकदा कात टाकून नवीन नेतृत्वाला. विशेषतः तरुणाईला यामध्ये संधी द्यावी लागेल. छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रेरणेतून शिवसेना काम करत आली आहे. समाजाच्या उन्नतीचा तोच विचार घेऊन पक्ष बांधणीच्या माध्यमातून शिवसैनिक या शहरातील जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी रस्त्यावर उतरून संघर्ष करतील. शहराच संपूर्ण संरक्षण आणि विकास हाच आमचा नारा आहे. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली अहिल्यानगर मध्ये मजबूत पक्षबांधणी आम्ही करू.

अशी होणार बांधणी :

यावेळी बोलताना किरण काळे यांनी संघटनात्मक बांधणीचा आराखडा कसा असेल याचं शिवसैनिकांना मार्गदर्शन केलं. शहर कार्यकारणी मध्ये सर्व उपनगरांसह मध्यवर्ती शहरातील प्रतिनिधींना वेगळ्या पदांच्या माध्यमातून स्थान दिले जाईल. सतरा प्रभागां करिता प्रभाग प्रमुख नेमले जातील. प्रभागाची स्वतंत्र कार्यकारणी असेल. प्रभागांच्या अंतर्गत शाखा गठित केल्या जातील. त्या खालोखाल प्रत्येक बूथ साठी बूथ प्रमुख आणि त्या कमिटीवर दहा सदस्यांचा समावेश केला जाईल. यामध्ये युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक यांच्यासह सर्व जाती धर्माच्या सदस्यांना सामावून घेतले जाईल.